पहिले राज्यस्तरीय परिवर्तनवादी साहित्य संमेलन 2026
परिवर्तनाचा विचार, साहित्याची शक्ती, समाजाचा विकास!

# निळे प्रतिक



मुख्य संपादक : रतनकुमार साळवे
एम.ए.(एम.सी.जे.), एम.ए.(फुले-डॉ.आंबेडकर थॉट), एम.ए. (पाली अँड बुद्धिझम), मो. ९९२३५०२३२०

वर्ष १७ वे | अंक क्र. ९ | सोमवार, ३ ऑगस्ट २०२६ | पृष्ठे ४, किंमत २ रु.

# एसटीच्या महिला वाहकाच्या प्रसंगावधानाने प्रवाशाला जीवदान

**सा. निळे प्रतिक वृत्तसेवा**

छत्रपती संभाजीनगर, प्रतिनिधी : छत्रपती संभाजीनगर येथील मध्यवर्ती बसस्थानकात रविवारी घडलेल्या एका हृदयस्पर्शी घटनेने माणुसकीचे दर्शन घडवले. अचानक हृदयविकाराचा झटका येऊन एका प्रवाशाची प्रकृती गंभीर झाल्याने बसस्थानकावर काही काळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. मात्र, एसटीच्या महिला वाहकाने दाखविलेल्या प्रसंगावधानामुळे आणि सीपीआर तंत्राचा योग्य वापर केल्याने संबंधित प्रवाशाला वेळेत जीवदान मिळाले.

प्रत्यक्षदर्शींच्या माहितीनुसार, प्रवासी अचानक बेशुद्ध पडताच परिसरात एकच धावपळ उडाली. अशा वेळी महिला वाहकाने कोणतीही भीती न बाळगता तत्काळ सीपीआर देण्यास सुरुवात केली. काही मिनिटांच्या प्रयत्नांनंतर प्रवाशामध्ये हालचाल दिसू लागली. त्यानंतर रुग्णवाहिकेद्वारे त्यांना तातडीने रुग्णालयात हलविण्यात आले.

या प्रसंगात महिला वाहकाने दाखविलेले धैर्य, तत्परता आणि मानवतेची जाणीव यामुळे उपस्थित नागरिकांनी तिचे कौतुक केले. वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, हृदयविकाराच्या झटक्यानंतर पहिल्या काही मिनिटांत दिलेला सीपीआर रुग्णाचा जीव वाचविण्यास अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

ही घटना केवळ एका व्यक्तीचे प्राण वाचविणारी नाही, तर आपत्कालीन परिस्थितीत प्रथमोपचाराचे प्रशिक्षण किती आवश्यक आहे, याची जाणीव करून देणारी आहे.

समाजातील प्रत्येक नागरिकाने सीपीआरसारख्या जीवनरक्षक कौशल्याचे प्रशिक्षण घेतल्यास अनेक अमूल्य जीव वाचू शकतात. संभाजीनगरच्या या घटनेने पुन्हा एकदा सिद्ध केले की, कर्तव्यापेक्षा माणुसकी मोठी असते आणि संकटसमयी दाखविलेली तत्परता हीच खरी सेवा असते.



रुग्णास सीपीआर देताना महिला वाहक.

# सरकारी डॉक्टरांना खासगी प्रॅक्टिसला परवानगी नाहीच

## व्यवसायरोध भत्ता अनिवार्य; खंडपीठाने डॉक्टरांच्या याचिका फेटाळल्या

छत्रपती संभाजीनगर : सरकारी सेवेत कार्यरत वैद्यकीय अधिकाऱ्यांना खासगी वैद्यकीय व्यवसाय करण्यास मनाई करणारा आणि व्यवसायरोध भत्ता (एनपीए) स्वीकारणे अनिवार्य करणारा राज्य शासनाचा २०१२चा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने कायम ठेवला आहे. न्या. किशोर संत आणि न्या. अजित कडेठाणकर यांच्या खंडपीठाने ३० जुलै रोजी या निर्णयाला आव्हान देणाऱ्या डॉक्टरांच्या याचिका फेटाळून लावल्या.

महाराष्ट्र शासनाने ७ ऑगस्ट २०१२ रोजी शासन निर्णय जारी करून सरकारी वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या खासगी व्यवसायावर पूर्णपणे बंदी घातली होती. या निर्णयातील कलम ४.१, ४.३ ते ४.५ आणि ४.७ला आव्हान देत काही डॉक्टरांनी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाकडे (मॅट) धाव घेतली होती. मॅटने १३ ऑक्टोबर २०१४ रोजी या याचिका फेटाळल्यानंतर डॉक्टरांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांनी केलेले सर्व युक्तिवाद न्यायालयाने फेटाळून लावले. महाराष्ट्र नागरी सेवा (सेवा अटी) नियम, १९८१ मधील नियम ३४चा संदर्भ देत सरकारी कर्मचाऱ्याचा पूर्णवेळ शासनाच्या सेवेसाठी असतो,

शासकीय रुग्णालयांमध्ये येणाऱ्या रुग्णांना डॉक्टरांची पूर्णवेळ आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी आणि सरकारी आरोग्यसेवेचा दर्जा कायम राहावा, यासाठी राज्य शासनाने घेतलेला हा धोरणात्मक निर्णय योग्य असल्याचे न्यायालयाने म्हटले. असे न्यायालयाने स्पष्ट केले. त्यामुळे पूर्वपरवानगीशिवाय अन्य नोकरी किंवा व्यवसाय करता येत नाही. तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक) नियम, १९७९मधील नियम १६नुसार पूर्वपरवानगीशिवाय प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे व्यापार करण्यास मनाई असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

**१९७२ च्या निर्णयाचा चुकीचा आधार**

याचिकाकर्त्यांनी १६ सप्टेंबर १९७२च्या शासन निर्णयाचा आधार घेतला होता. मात्र, या निर्णयात केवळ दुर्गम आणि आदिवासी भागांतील सुमारे ३० टक्के प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील डॉक्टरांना अपवाद म्हणून खासगी प्रॅक्टिसची परवानगी देण्यात आली होती. सर्व सरकारी डॉक्टरांना खासगी प्रॅक्टिसची सर्वसाधारण परवानगी कधीही नव्हती, असे न्यायालयाने स्पष्ट केले.

# तोतया पोलिसाच्या आवळल्या मुसक्या; सोन्यासह ४० लाखांचा मुद्देमाल जप्त

छत्रपती संभाजीनगर : हैदराबादहून शहरात येऊन पोलिस असल्याची बतावणी करीत वृद्ध महिलांसह पुरुषांना फसवून लुटणारा आरोपी गुन्हे शाखेच्या पथकाने पकडला. त्याच्याकडून फसवणुकीतील २९ लाखांचे २६.५ तोळे सोने आणि दुचाकी असा ४० लाखांचा मुद्देमालही जप्त केला. हैदराबादचा रहिवासी सासुरवाडीत येऊन फसवणूक करीत होता. या कारवाईत शहरातील ८ गुन्हे उघडकीस आले असून, नागपुरातील एक गुन्हाही पुढे आला नाही.

(५२, रा. हैदराबाद, ह.मु, पाण्याच्या बंबाजवळ, किराडपुरा), आरोपीचे नाव आहे. त्याला हर्सल पोलिसांच्या ताब्यात दिले. त्याने नागपूर, भंडारा, पुणे, कोल्हापूर आदी ठिकाणी तोतयेगिरी करून लुबाडणूक केल्याची माहिती गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक गजानन कल्याणकर यांनी दिली. रस्त्यावर वृद्धांना रोखून बतावणी करीत सोन्याचे दागिने लुबाडण्याच्या अनेक घटना शहरात घडल्या होत्या. मात्र, अनेक दिवसांपासून हा आरोपी पोलिसांना गुंगारा देत होता. गुन्हे शाखा प्रत्येक वेळी त्याचा माग काढायची, पण तो निसटायचा. २६ जुलैला हर्मूल

**आरोपी रेकॉर्डवरील गुन्हेगार**

आफताब ऊर्फ फईम शेख हा रेकॉर्डवरील आरोपी आहे. त्याच्या विरोधात ९ गुन्ह्यांसह हैदराबाद व पुण्यात ६ गुन्हे दाखल आहेत. २०२२ मध्ये पुणे पोलिसांनी त्याला अटक केली होती.

नोव्हेंबर २०२५ मध्ये तेलंगणा पोलिसांनी त्याला बेड्या ठोकल्या होत्या. तो जानेवारी २०२६ पर्यंत तेथे अटकेत होता. त्यानंतर आता ऑगस्ट २०२६ मध्ये त्याला शहर पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्यावर आतापर्यंत दोन वेळा बायपास शस्त्रक्रिया झाल्या आहेत.

# संपादकिय...!

## शिक्षणाचा वाढता खर्च : गुणवत्तेचे शिक्षण की आर्थिक शोषण?

शिक्षण हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत हक्क मानला जातो. भारतीय राज्यघटनेने शिक्षणाला केवळ ज्ञानप्राप्तीचे साधन म्हणून नव्हे, तर सामाजिक परिवर्तन आणि समान संधीचे प्रभावी माध्यम म्हणून स्वीकारले आहे. मात्र आजची वस्तुस्थिती पाहिली तर शिक्षणाचे क्षेत्र दिवसेंदिवस अधिकाधिक व्यापारीकरणाच्या विळख्यात अडकताना दिसत आहे. शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्याच्या नावाखाली वाढणाऱ्या फी, विविध प्रकारचे अतिरिक्त शुल्क आणि प्रवेश प्रक्रियेतील आर्थिक अटी यामुळे सामान्य कुटुंबाचे आर्थिक गणित पूर्णपणे कोलमडत आहे.

आज अनेक पालक आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी कर्ज काढत आहेत, बचत मोडत आहेत किंवा इतर आवश्यक खर्चांना कात्री लावत आहेत. शिक्षण हे गुंतवणूक असली तरी ती सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर जाऊ लागली, तर समाजातील विषमता आणखी तीव्र होणार यात शंका नाही. गुणवत्तापूर्ण शिक्षण हे श्रीमंतांसाठी आणि तडजोडीचे शिक्षण हे गरीबांसाठी, अशी धोकादायक दरी निर्माण होऊ लागली आहे.

शाळा सुरू होण्यापूर्वीच प्रवेश शुल्क, विकास निधी, संगणक शुल्क, प्रयोगशाळा शुल्क, गणवेश, पुस्तके, वह्या, वाहतूक, डिजिटल शिक्षण, विविध उपक्रम अशा अनेक नावाखाली पालकांकडून हजारो रुपये आकारले जातात. अनेकदा शासनाने निश्चित केलेल्या नियमांचे पालन होत नाही. फी वाढीबाबत पारदर्शकता नसल्याने पालकांना प्रश्न विचारण्याची संधीही मिळत नाही. तक्रार केली तर मुलांच्या भवितव्याची चिंता त्यांना गप्प बसायला भाग पाडते.

दुसरीकडे, शिक्षण संस्था देखील वाढत्या खर्चाचे कारण पुढे करतात. शिक्षकांचे वेतन, आधुनिक तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा, प्रयोगशाळा, डिजिटल वर्ग आणि इतर खर्च वाढल्याचे त्यांचे म्हणणे असते. यात काही अंशी तथ्य असले तरी प्रत्येक फीवाढ न्याय्य असतेच असे म्हणता येणार नाही. शिक्षण क्षेत्रात सेवा आणि सामाजिक बांधिलकी यांचे स्थान कमी होऊन आर्थिक नफ्याचे गणित अधिक महत्त्वाचे ठरत असल्याची भावना वाढत आहे.

ग्रामीण आणि शहरी भागातील परिस्थितीतही मोठी तफावत आहे. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी मर्यादित आहेत. शहरी भागात शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध असल्या तरी त्यांची किंमत सामान्य कुटुंबाला परवडणारी नाही. परिणामी गुणवत्तेच्या शिक्षणावर आर्थिक परिस्थितीचा प्रभाव पडू लागला आहे. ही स्थिती सामाजिक न्यायाच्या संकल्पनेलाच आव्हान देणारी आहे.

या प्रश्नाकडे केवळ पालक किंवा शिक्षण संस्था यांच्या वादाच्या दृष्टीने पाहून चालणार नाही. शासनानेही आपली भूमिका अधिक प्रभावीपणे पार पाडण्याची गरज आहे. फी नियमन समित्या सक्षम करणे, त्यांच्या निर्णयांची कठोर अंमलबजावणी करणे, पालकांच्या तक्रारींचे तातडीने निवारण करणे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संस्थांवर कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर सरकारी शाळा आणि महाविद्यालयांचा दर्जा उंचावणे ही काळाची गरज आहे. सार्वजनिक शिक्षण व्यवस्था सक्षम झाली तर खासगी शिक्षण संस्थांवर नैसर्गिक नियंत्रण येईल.

शिक्षण ही बाजारात विकली जाणारी वस्तू नाही; ती समाजाच्या भविष्याची पायाभरणी आहे. डॉक्टर, अभियंते, शिक्षक, प्रशासकीय अधिकारी, वैज्ञानिक आणि जबाबदार नागरिक घडविण्याचे कार्य शिक्षणातूनच होते. त्यामुळे शिक्षणाला केवळ नफा-तोट्याच्या चौकटीत मोजणे धोकादायक आहे. पालकांनीही आपल्या हक्कांबाबत जागरूक राहणे आवश्यक आहे. शाळा व्यवस्थापन समित्या, पालक संघटना आणि स्थानिक प्रशासन यांच्या माध्यमातून संवाद वाढविणे गरजेचे आहे. संघर्ष हा शिक्षण संस्थांशी नसून शिक्षण व्यवस्थेतील पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि न्याय्यतेसाठी असला पाहिजे. आज आवश्यकता आहे ती शिक्षण क्षेत्रात संतुलन निर्माण करण्याची. गुणवत्तेचे शिक्षण देणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन मिळाले पाहिजे; मात्र त्याच वेळी विद्यार्थी आणि पालकांचे आर्थिक शोषण थांबले पाहिजे. शिक्षण हा प्रत्येक मुलाचा अधिकार आहे, विशेषाधिकार नाही. समाजातील कोणताही विद्यार्थी केवळ आर्थिक अडचणीमुळे शिक्षणापासून वंचित राहू नये, हीच लोकशाही आणि संविधानाची खरी अपेक्षा आहे.

शिक्षणाचे मंदिर हे समाज घडविण्याचे केंद्र असते. त्या मंदिरात प्रवेशाची अट पैशांची नसून गुणवत्तेची, समान संधीची आणि मानवी मूल्यांची असली पाहिजे. अन्यथा शिक्षणातून समानता नव्हे, तर विषमता निर्माण होईल. आणि हे कोणत्याही प्रगत समाजासाठी निश्चितच हितावह ठरणार नाही.

# लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना जयंतीनिमित्त जिल्हा परिषदेत अभिवादन!



छत्रपती संभाजीनगर : महाराष्ट्राच्या स्वातंत्र्य लढ्यातील अग्रणी आंदोलक, नामवंत साहित्यिक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना त्यांच्या १०६ व्या जयंतीनिमित्त जिल्हा परिषदेमध्ये अभिवादन करण्यात आले.

जिल्हा परिषदेच्या वेरूळ सभागृहात झालेल्या या कार्यक्रमात जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष माननीय जितेंद्र जयस्वाल यांनी अध्यक्षीय समारोपात अण्णाभाऊ साठे यांच्या विचारावर समाजाने चालले पाहिजे, समाजातील विषमता दूर करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे. आयुष्यभर अण्णा भाऊंनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांच्या समतेचा पुरस्कार करत अण्णाभाऊंचे कार्यकर्तृत्व आणि त्यांच्या साहित्यावर प्रकाश टाकला तर समाज कल्याण सभापती बालाजी सोनटक्के यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या विषयी बोलताना त्यांनी आपल्या हयातीत "आहे रे आणि नाही रे" वर्गामध्ये जोपर्यंत समानता येत नाही; तोपर्यंत समाज सुधारणार नाही हे त्यांनी हेरल्यामुळे आयुष्यभर आपल्या साहित्य आणि शाहिरीच्या माध्यमातून समाज प्रबोधनाचे काम केले असल्याचे विशद केले.

यावेळी समाज कल्याण विभागाचे विस्तार अधिकारी विजेंद्र डकले, देविदास बिरारे, बबन अरसुळ, प्रशांत पाटील, कल्पना ढाकणे, संजय वाघ, कल्याण ढोरकुले, जनार्दन चव्हाण, विनोद शेळके यांच्यासह अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन संगीता साळुंके - गायकवाड यांनी केले.

# किरण मानेना दिली प्रबोधननायक ही उपाधी

छ. संभाजीनगर : आधुनिक काळात आपल्या लिखाणाने, वाणीने लोकांना जागृत करणारे दाभोळकर, कुलबर्गी, पानसरे यांच्या कट करून हत्या करण्यात आल्या . आणि अलीकडे तर अशा शक्तींनी उन्माद मांडला असताना सुद्धा नाट्य कलेच्या प्रभावी माध्यमातून प्रसिद्ध सिनेकलावंत किरण माने यांनी प्रस्थापित प्रवाहाच्या विरुद्ध दिशेने लोकांचे प्रबोधन करण्याचे अभियान चालविले आहे . हे प्रशंसनीय कार्य लक्षात घेऊन त्यांना प्रबोधननायक ह्या उपाधीने सन्मानित करण्यात आले आहे.



दिनांक १२ जुलै रोजी द किरण माने शो स्टोरी शिवराज्याभिषेकाची या महाराष्ट्रात गाजत असलेल्या नाट्य प्रयोगाचे प्रियदर्शिनी इंदिरा गांधी सांस्कृतिक सभागृह, चंद्रपूर येथे आयोजन केले होते , त्याचे औचित्य साधून एका दिमाखदार सोहळ्यात शिव-फुले- शाहू - आंबेडकरी विविध सामाजिक संघटनांच्या वतीने, प्रा. दिलीप चौधरी, नागवंश नगराळे, संतोष कुचणकर, डॉ. अभिलाषा गावतुरे, प्रा. माधव गुरुनुले, दिपक जेऊरकर, वैशाली रामटेके, प्रा. मिलिंद भगत, प्रदीप देशमुख, संगीता धोटे यांचे हस्ते, उद्घाटक कुंदन ढोरे , अध्यक्ष दिलीप वावरे, प्रमुख अतिथी चंद्रकांत वासाडे, डॉ. जयश्री कापसे, प्राचार्य नरेंद्र बोबडे, प्रा. इसादास भडके, डॉ. विनोद नगराळे, डॉ. विजय उराडे, इंजि .गौतम नागदेवते, एड. राजेश वनकर, शिलवान ढोके यांचे प्रमुख उपस्थितीत , प्रचंड संख्येनी असलेल्या बहुजनांच्या टाळ्यांच्या गजरात मानेना ही उपाधी देण्यात आली. बहुजनांचा उद्धारासाठी त्यांच्यात जागृती महत्वाची आहे, हे लक्षात घेऊन महात्मा फुले व प्रबोधनकार ठाकरे यांनी चळवळ चालविली, त्यांचा जनतेने महात्मा व प्रबोधनकार ही उपाधी देऊन गौरव केला . तो एक इतिहास आहे , त्याचप्रमाणे किरण माने हे प्रबोधननायक म्हणून इतिहासात नोंद होतील असा आशावाद या प्रसंगी व्यक्त करण्यात आला . या सोहळ्याचे संचालन एड. रवींद्र मोटघरे यांनी केले . सर्व व्यवस्था उत्तम ठेवण्यासाठी सुधाकर खरवडे, बुद्धप्रकाश ठमके, विद्याधर लाडे, पूनमचंद वाकडे, रवींद्र भैसारे, नयन देशकर, सिद्धांत पुणेकर इ. नी परिश्रम घेतले.

# लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे स्मारक वंचितांच्या संघर्षाचे प्रेरणास्थान ठरेल

मुंबई, : लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य, विचार आणि सामाजिक कार्य हे केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नसून संपूर्ण जगाला प्रेरणा देणारे आहे. चिरागनगर या त्यांच्या कर्मभूमीत उभारण्यात येणारे लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था आणि स्मारक हे केवळ एक वास्तू नसून वंचित, कष्टकरी आणि उपेक्षित समाजाच्या संघर्षाचे, स्वाभिमानाचे; तसेच सामाजिक परिवर्तनाचे जिवंत प्रतीक ठरेल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. चिरागनगर झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांच्या वतीने उभारण्यात येणाऱ्या लोकशाहीर साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे संशोधन व प्रशिक्षण संस्था आणि स्मारकाच्या पहिल्या टप्प्याच्या भूमिपूजन समारंभात ते बोलत होते.

हे साप्ताहिक पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक रतनकुमार साळवे यांनी श्री प्रिंटर्स, अक्षयदीप प्लाझा, सिडको येथे छापून अयोध्या नगर, एफ ४/१४, सिडको एन-७, औरंगाबाद पिन ४३१ ००३ (महा.) येथे प्रसिद्ध केले. (या अंकात प्रकाशित झालेल्या वृत्ताविषयी संपादक सहमत असतीलच असे नाही. कोणताही वाद औरंगाबाद न्यायालयाअंतर्गत) RNI. No. MAHMAR/2009/29271

# धम्मनिष्ठ, न्यायप्रिय आणि परिवर्तनवादी विचारांचे अखंड दीपस्तंभ ॲड. एकनाथ रामटेके


## प्रथम स्मृतिदिनानिमित्त विनम्र अभिवादन

आज ॲड. एकनाथ रामटेके यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन! त्यांचे शारीरिक अस्तित्व आज आपल्यात नसले, तरी त्यांनी उभारलेला विचारांचा, ज्ञानाचा, धम्मनिष्ठेचा आणि सामाजिक न्यायाचा वारसा आजही असंख्य विद्यार्थी, कार्यकर्ते आणि समाजबांधवांना प्रेरणा देत आहे. त्यांनी आयुष्यभर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समतेच्या विचारांचा आणि भगवान गौतम बुद्धांच्या धम्माचा प्रचार-प्रसार करत समाजप्रबोधनाचे महान कार्य केले. त्यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त त्यांच्या कर्तृत्वाचा जागर करणे म्हणजे त्यांच्या विचारांना आणि कार्याला विनम्र अभिवादन करण्यासारखे आहे.

समाजात काही व्यक्तिमत्त्वे अशी असतात की त्यांचे संपूर्ण आयुष्य हे स्वतःसाठी नव्हे, तर समाजाच्या उन्नतीसाठी, ज्ञानप्रसारासाठी आणि न्यायाच्या स्थापनेसाठी समर्पित असते. अशाच व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे ॲड. एकनाथ रामटेके. साधेपणा, प्रखर बुद्धिमत्ता, धम्मनिष्ठा, सामाजिक बांधिलकी आणि परिवर्तनवादी विचारांचा अखंड वारसा जपणारे ते एक अभ्यासू, कर्तव्यदक्ष आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व होते. ॲड. रामटेके यांनी आपल्या आयुष्याचा मोठा भाग शिक्षण क्षेत्राला वाहिला. विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करणे, त्यांच्यामध्ये विवेक, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक जाणीव निर्माण करणे हे त्यांनी आपले जीवनध्येय मानले. शिक्षक म्हणून त्यांनी केवळ पुस्तकी ज्ञान दिले नाही, तर जीवनमूल्ये, संविधाननिष्ठा आणि समतेची शिकवणही दिली. त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करत आहेत.

सेवानिवृत्तीनंतर अनेकजण विश्रांतीचा मार्ग स्वीकारतात; परंतु ॲड. एकनाथ रामटेके यांनी समाजसेवेचा नवा अध्याय सुरू केला. त्यांनी वकिली व्यवसाय स्वीकारून गोरगरीब, वंचित आणि अन्यायग्रस्त नागरिकांना न्याय मिळवून देण्यासाठी स्वतःला झोकून दिले. न्यायालय हे त्यांच्यासाठी केवळ व्यवसायाचे क्षेत्र नव्हते, तर सामाजिक न्यायाची लढाई लढण्याचे प्रभावी माध्यम होते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल लोकांना त्यांनी मोलाचे कायदेशीर मार्गदर्शन केले आणि अनेकांना न्याय मिळवून दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा त्यांच्यावर अत्यंत खोल प्रभाव होता. बाबासाहेबांनी दिलेल्या २२ प्रतिज्ञांचा त्यांनी केवळ स्वीकारच केला नाही, तर त्या समाजापर्यंत पोहोचविण्याचे आणि त्यांच्या आचरणाचे महत्त्व पटवून




देण्याचे महान कार्य आयुष्यभर केले. ते २२ प्रतिज्ञांचे प्रभावी प्रचारक होते. त्यांच्या प्रत्येक भाषणात समता, बंधुता, स्वातंत्र्य, वैज्ञानिक दृष्टी आणि मानवतावादी मूल्यांचा ठाम आग्रह दिसून येत असे. त्यांनी अनेक वर्तमानपत्रातून लिखाण केलेले आहे.

बौद्ध धम्माशी त्यांची निष्ठा अढळ होती. त्यांनी पंचशील, अष्टांगिक मार्ग आणि तथागत गौतम बुद्धांच्या शिकवणीचे प्रामाणिकपणे पालन केले. धम्म हा केवळ उपासनेचा विषय नसून तो जगण्याची पद्धत आहे, यावर त्यांचा दृढ विश्वास होता. त्यांनी स्वतः धम्माचे आचरण केले आणि इतरांनाही धम्ममार्गावर चालण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या जीवनात शिस्त, करुणा, प्रज्ञा आणि मैत्रीभाव यांचा सुंदर संगम दिसून येत असे.

ॲड. रामटेके हे अत्यंत व्यासंगी, चिंतनशील आणि अभ्यासू लेखकही होते. सामाजिक, शैक्षणिक, बौद्ध आणि परिवर्तनवादी विषयांवर त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. त्यांचे लेखन हे केवळ साहित्यनिर्मिती नव्हते, तर समाजप्रबोधनाचे प्रभावी माध्यम होते. त्यांनी आपल्या लेखणीतून विवेक, समता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि सामाजिक परिवर्तनाचा संदेश दिला. त्यांच्या साहित्याने अनेकांना विचार करण्याची नवी दिशा दिली. सामाजिक चळवळीतील त्यांचा सहभाग अत्यंत उल्लेखनीय होता. कोणताही सामाजिक, शैक्षणिक, बौद्ध किंवा परिवर्तनवादी कार्यक्रम असो, ते नेहमी उत्साहाने आणि हिरीरीने सहभागी होत असत. कार्यकर्त्यांना प्रेरणा देणे, नव्या पिढीला मार्गदर्शन करणे आणि समाजात संघटनशक्ती निर्माण करणे, हे त्यांचे वैशिष्ट्य होते. त्यांच्या उपस्थितीने प्रत्येक कार्यक्रमाला वैचारिक उंची लाभत असे.

त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक महत्त्वाचा गुण म्हणजे दान पारमिता. त्यांनी आपल्या ज्ञानाचे, वेळेचे, श्रमाचे आणि सामर्थ्याचे उदारपणे समाजासाठी दान केले. कोणतीही अपेक्षा न ठेवता इतरांच्या मदतीला धावून जाणे हा त्यांचा स्वभाव होता. त्यामुळे समाजातील सर्व स्तरांतील लोक त्यांचा मनापासून आदर करत होते. ॲड. एकनाथ रामटेके यांचे संपूर्ण जीवन हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समतावादी विचारांचे आणि भगवान गौतम बुद्धांच्या धम्मतत्त्वांचे जिवंत उदाहरण होते. त्यांनी शिक्षण, न्याय, साहित्य, धम्मप्रचार आणि समाजसेवा या सर्व क्षेत्रांत मोलाचे योगदान दिले. त्यांच्या कार्याची उंची केवळ त्यांच्या पदामुळे नव्हे, तर त्यांनी जपलेल्या मूल्यांमुळे अधिक मोठी आहे. त्यांनी समाजात विचारांची, ज्ञानाची आणि मानवतेची जी मशाल प्रज्वलित केली, ती येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी मार्गदर्शक ठरेल. आज त्यांच्या प्रथम स्मृतिदिनानिमित्त संपूर्ण आंबेडकरी, बौद्ध आणि परिवर्तनवादी समाज त्यांना कृतज्ञतापूर्वक स्मरण करीत आहे. त्यांनी दिलेला विचारांचा वारसा, न्यायासाठीची बांधिलकी, धम्मनिष्ठ जीवनशैली आणि समाजप्रबोधनाची प्रेरणा पुढील पिढ्यांसाठी दीपस्तंभ ठरत राहील. त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन. ''सब्बदानं धम्मदानं जिनाति'' सर्व दानांमध्ये धम्मदान श्रेष्ठ आहे. ॲड. एकनाथ रामटेके यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यभर ज्ञानदान, धम्मदान आणि न्यायदानाचा जो महान आदर्श समाजासमोर ठेवला, तो सदैव प्रेरणादायी राहील.

**भवतु सब्ब मंगलं!**

# भाकरी देणेही गुन्हा ठरले आहे का?

**प्रविण बागडे**
**नागपूर**
**मो.क्र. ९९२३६२०९१९**

लोकशाहीत सरकारला प्रश्न विचारणे गुन्हा नाही. अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे गुन्हा नाही. आपल्या हक्कांसाठी रस्त्यावर उतरणे गुन्हा नाही. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, आंदोलन करणाऱ्या उपाशी माणसाला दोन घास अन्न देणे तर कोणत्याही सभ्य समाजात गुन्हा असूच शकत नाही! मग जंतर-मंतरवर आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांना आणि तरुणांना अन्न-पाणी पुरवणाऱ्या जुनैद खान यांच्या घरापर्यंत पोलिस का पोहोचले? त्यांच्या कुटुंबीयांची चौकशी का झाली? वृद्ध वडिलांना आणि भावाला प्रश्नांच्या फैरीला सामोरे का जावे लागले? हा दबाव होता की नेहमीची चौकशी? जर ही केवळ चौकशी असेल, तर तिचे कारण काय? आणि जर कोणताही गुन्हा नसेल, तर एका नागरिकाच्या कुटुंबाला पोलिसांच्या दारात उभे करण्याची गरज काय? हे प्रश्न फक्त जुनैदच्या घराचे नाहीत तर हे प्रश्न आज भारतीय लोकशाहीच्या घराचे आहेत!

जंतर-मंतरवर आंदोलन करणारे विद्यार्थी कोण आहेत? ते या देशाचे नागरिक आहेत. त्यांच्या हातात दगडाऐवजी प्रश्न आहेत. त्यांच्या डोळ्यांत भविष्याची चिंता आहे. त्यांच्या आवाजात शिक्षण, रोजगार, परीक्षा व्यवस्था आणि भवितव्याबद्दलचा आक्रोश आहे. त्यांच्या मागण्या सरकारला मान्य नसतील, तर सरकारने त्या मागण्यांना उत्तर द्यावे. त्यांच्याशी चर्चा करावी. त्यांच्या प्रश्नांची उत्तरे द्यावीत. पण आंदोलकांना अन्न देणाऱ्या माणसाच्या घरापर्यंत पोलिस पोहोचत असतील, तर हा प्रकार लोकशाहीच्या कोणत्या व्याख्येत बसतो? सत्ता प्रश्नांना घाबरते तेव्हा ती प्रश्न विचारणाऱ्याला लक्ष्य करते. पण प्रश्न विचारणाऱ्याला अन्न देणाऱ्याच्या घरापर्यंत पोहोचते, तेव्हा सत्तेची भीती आणखी खोल झाल्याचे दिसते! या प्रकरणातील आरोप पोलिसांनी नाकारले असतील, तर त्यांनी सत्य जनतेसमोर स्पष्ट करावे. पोलिसांनी कोणतीही बेकायदेशीर कारवाई केली नसेल, तर संपूर्ण वस्तुस्थिती पारदर्शकपणे सांगावी. पण केवळ आरोप नाकारून प्रश्न संपत नाहीत. कारण लोकशाहीत नागरिकांना प्रश्न विचारण्याचा अधिकार आहे आणि सत्तेने त्यांची उत्तरे देण्याची जबाबदारी स्वीकारली पाहिजे. जुनैदने आंदोलकांना अन्न दिले असेल, तर त्याचा गुन्हा काय?, त्याने बंदूक दिली का?, त्याने बॉम्ब दिला का?, त्याने हिंसाचाराला प्रोत्साहन दिले का?, की त्याने फक्त भुकेल्या माणसाला भाकरी दिली? जर भाकरी देणे गुन्हा असेल, तर मग या देशातील लंगर, अन्नछत्रे, समाजसेवी संस्था आणि आंदोलनस्थळी भोजन देणाऱ्या हजारो हातांचे काय? एखाद्या आंदोलनात सहभागी असलेल्या माणसाला पाणी देणाऱ्याला उद्या 'आंदोलनाचा समर्थक' म्हणून आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले जाणार आहे का? सत्तेला विरोध करणाऱ्यांना उपाशी ठेवून लोकशाही मजबूत होत नाही.

लोकशाहीचा अर्थ असा नाही की नागरिकांनी फक्त मतदानाच्या दिवशी बोलावे आणि उर्वरित पाच वर्षे गप्प बसावे. लोकशाहीचा अर्थ असा आहे की नागरिकांनी सरकारला प्रश्न विचारावेत, चुकीच्या धोरणांवर टीका करावी, अन्यायाविरुद्ध आंदोलन करावे आणि गरज पडल्यास रस्त्यावर उतरावे. सरकारला आंदोलन आवडत नसेल, तर त्याने आंदोलनाची कारणे संपवावीत. **(क्रमशः)**

# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस अनुसूचित जाती विभागाच्या जनरल सेक्रेटरीपदी डॉ. अरुण शिरसाट यांची नियुक्ती



छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या अनुसूचित जाती विभागाच्या जनरल सेक्रेटरीपदी डॉ. अरुण शिरसाट यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या नियुक्तीबद्दल त्यांनी काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाचे आभार मानले आहेत.

डॉ. शिरसाट यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, पक्षाने माझ्यावर दाखविलेल्या विश्वासाबद्दल मी राष्ट्रीय नेते , , अनुसूचित जाती विभागाचे राष्ट्रीय अध्यक्ष गौतम पाल, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष , माजी मंत्री , अनुसूचित जाती विभागाचे प्रदेशाध्यक्ष अनिरुद्ध वानकर तसेच मनोज बागडी यांचा मन:पूर्वक ऋणी आहे.

यावेळी डॉ. शिरसाट यांनी सांगितले की, पक्षाने सोपविलेल्या जबाबदारीला पूर्ण न्याय देण्यासाठी मी कटिबद्ध असून राज्यातील आंबेडकरी समाजातील अधिकाधिक नागरिकांना काँग्रेस पक्षाशी जोडण्यासाठी विशेष प्रयत्न करणार आहे. अनुसूचित जाती समाजाच्या प्रश्नांना प्राधान्य देत पक्ष संघटना मजबूत करण्यासाठी आणि तळागाळात काँग्रेसची विचारधारा पोहोचविण्यासाठी काम करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

काँग्रेस पक्षाच्या वरिष्ठ नेतृत्वाने माझ्यावर टाकलेल्या विश्वासाला पात्र ठरत संघटन वाढीसाठी व पक्ष बळकटीकरणासाठी सर्वतोपरी प्रयत्न करेन, असा विश्वासही डॉ. अरुण शिरसाट यांनी व्यक्त केला आहे.

# डॉ. मिलिंद दुसाने यांना पितृशोक; वडील मधुकर दुसाने यांचे दुःखद निधन

छत्रपती संभाजीनगर - छत्रपती संभाजीनगर जिल्हा माहिती कार्यालयाचे जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने यांचे वडील तथा धुळे येथील सेवानिवृत्त लेखा परीक्षक श्री. मधुकर गोविंद दुसाने (वय ७८) यांचे सोमवार (दि. २७) रोजी रात्री १० वाजता अकस्मात निधन झाले. त्यांच्या निधनामुळे दुसाने कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला असून प्रशासकीय, सामाजिक व पत्रकारिता क्षेत्रातून शोक व्यक्त करण्यात येत आहे.

श्री. मधुकर दुसाने यांनी लेखा परीक्षक म्हणून प्रदीर्घ काळ प्रामाणिकपणे सेवा बजावली होती. त्यांच्या शांत, मनमिळावू आणि कर्तव्यदक्ष स्वभावामुळे त्यांना समाजात मानाचे स्थान होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी, सुना, जावई, नातवंडे व नातसून असा मोठा परिवार आहे.

डॉ. मिलिंद दुसाने यांच्यावर ओढवलेल्या या दु:खद प्रसंगाबद्दल विविध स्तरांतून शोकसंवेदना व्यक्त करण्यात येत आहेत.

# केहाळ वडगावात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी



मंठा : मंठा तालुक्यातील केहाळ वडगाव येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०६ वी जयंती मोठ्या उत्साहात आणि थाटामाटात साजरी करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यानंतर गावातील प्रमुख मार्गावरून ढोल-ताशांच्या गजरात, जयघोष आणि घोषणाबाजी करत भव्य मिरवणूक काढण्यात आली. ‘‘लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या घोषणांनी संपूर्ण गाव दुमदुमून गेले. शोभायात्रेत युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच लहान मुलांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदविला. कार्यक्रमादरम्यान उपस्थित मान्यवरांनी अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्य, समाजप्रबोधन आणि सामाजिक समतेसाठीच्या कार्याचा गौरव केला. त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संकल्प यावेळी व्यक्त करण्यात आला. शोभायात्रेचा समारोप उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. संपूर्ण गावात जयंतीनिमित्त आनंदाचे आणि उत्सवाचे वातावरण निर्माण झाले होते.

# छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकारण कामाचा आयुक्त जी.श्रीकांत यांच्याकडून आढावा



छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (सीएसएमआरडीए) अंतर्गत समाविष्ट ३१३ गावांचा आणि झालर क्षेत्राचा सुनियोजित व सर्वसमावेशक विकास करण्यासाठी प्राधिकरणाच्या पायाभूत सुविधांचा अभ्यास, विश्लेषण, मॅपिंग (जीआयएस) आणि इतर बाबींच्या कामकाजाचा प्राधिकरणाचे आयुक्त तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी आज आढावा घेतला.

छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यालयातील सभागृहात कामकाज आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी छत्रपती संभाजीनगर प्राधिकरणाचे महानगर नियोजनकार हर्षल बाविस्कर, महानगर उपायुक्त (प्रशासन) लखीचंद चव्हाण तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. आयुक्त जी. श्रीकांत यांनी प्राधिकरण क्षेत्रातील नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देणे आणि नियोजित विकास साध्य करणे हेच प्राधिकरणाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे सांगत त्याअनुषंगाने प्राधिकरण कार्यप्रणाली समजावून सांगण्यासाठी प्राधिकरण क्षेत्रातील सर्व गावातील लोकप्रतिनिधी,जिल्हा परिषद, महसूल आणि संबंधित अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी कार्यशाळा आयोजित करावी. तसेच संबंधित अधिकारी कर्मचारी यांच्या कर्तव्य व जबाबदारीची निश्चिती करावी अशी सूचना केली.

त्याचबरोबर एक ऑगस्ट पासून प्राधिकरणाचे कार्यालयीन कामकाज ई ऑफिस प्रणाली द्वारे सुरू झालेच पाहिजे त्याअनुषंगाने आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. तसेच वेरूळ -घृष्णेश्वर मंदिर परिसरातील घनकचरा व्यवस्थापनासाठी कंत्राटदाराची निवड करणे, आपले सरकार पोर्टल वरील तक्रारी प्राप्त झाल्यास त्याची निवारण करणे, सात दिवसांपेक्षा अधिक देयके प्रलंबित राहणार नाही याची दक्षता घेणे, प्राधिकरण हद्दीतील अनधिकृत मालमत्ता गुंठेवारीसाठी आलेले प्रस्ताव, मंजूर, नामंजूर आणि प्रलंबित प्रस्तावांची माहिती, याबाबतचा आढावाही आयुक्त जी.श्रीकांत यांनी घेतला. तसेच छत्रपती संभाजीनगर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयासाठी किमान दोन एकर शासकीय जागा असण्याबाबत पाठपुरावा करण्याची सूचनाही आयुक्त जी. श्रीकांत यांनी संबंधित अधिकाऱ्यांना केली. यावेळी त्यांनी मसीआ, क्रेडाई, सीएसएन फर्स्ट चे प्रतिनिधी, पदाधिकारी यांच्याही समस्या जाणून घेतल्या.

# निवडणूक आयोग भाजपाच्या ताब्यात!

## माजी खा. तुकाराम पाटील रेंगे यांचा आरोप



छ. संभाजीनगर : राष्ट्रीय पातळीपासून तर तालुका पातळीपर्यंतची सगळी निवडणूकचंउ यंत्रणा भाजपाने ताब्यात घेतली आहेत त्यामुळे कॉंग्रेसच्या बीएलओ २ अधिक सर्तक राहून काम करा असे आवाहन जिल्हा प्रभारी तथा संपर्क नेते माजी खासदार तुकाराम पाटील रेंगे यांनी केले. ते म्हणाले की, आपापल्या भागात मतदान वाढविण्याची जबाबदारी बीएलओ २ ची आहे त्यामुळे कार्यकर्ते यांनी जोमाने काम करावे असे आवाहन रेंगे यांनी केले.

यावेळी खासदार डॉ कल्याण काळे यांनी पक्षाची विचारधारा जनमानसात पोहचवा कुणी मतदार यादीतून बाद होता कामा नये यासाठी सर्वांनी काळजी घ्यावी असे सांगून येणारा काळ हा निश्चितच कॉंग्रेस चा राहील असा दिलासा दिला. यावेळी जिल्हा उपाध्यक्ष.संदीप बोरसे जगन्नाथ काळे, तालुकाध्यक्ष संतोष मेटे, श्रीमंत उकर्डे, उपनगराध्यक्ष जमीर पठाण, शहराध्यक्ष मुदसर पटेल, सुभाष गायकवाड, रज्जाक शेख, पंचायत समिती सदस्य गणेश पाटील काळे, राहूल सोनवणे, बाबुराव डकले, सदाशिव विटेकर, सुनिता मारग, रेखा वाहटूळे, भाऊसाहेब पाटील क्षिरसागर, सुरेश मुळे, जनार्दन तुपे, प्रभाकर वाघ, कचरु मैंद, लहू मानकापे.